# फळसेवाडी हितकारी संस्था

फळसेवाडी, गाव – पिसेकामते
तालूका – कणकवली, जिल्हा – सिंधुदूर्ग, महाराष्ट्र राज्य

## सर्वसाधारण सभा – इतिवृत्त

दिनांक २७ ऑगष्ट २०१७

दिनांक १५ एप्रिल २०१७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत फळसेवाडी हितकारी संस्थेची एक सर्वसाधारण सभा गावी वास्तव्यास असलेल्या (स्थानिक) सभासदांच्या / ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी तसेच संस्था आखत असलेल्या आणि गावकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने योग्य वाटणाऱ्या योजनांबद्दल स्थानिकांना अवगत करावे या दृष्टीने आयोजित करावयाचे ठरविण्यात आले होते. त्यानुसार स्थानिकांसाठी सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २७ ऑगष्ट २०१७ रोजी सायंकाळी ४:३० वाजता श्रीमती अनुजा अरुण राणे (स्थानिक कार्यकारीणी सदस्या) यांच्या अंगणामध्ये घेण्यात आली.

सर्वसाधारण सभेस स्थानिकांव्यतिरिक्त श्री गणेस उत्सवासाठी गावी उपस्थित असलेले असे एकूण ३७ स्थानिक ग्रामस्थ / सभासद / मुंबईत वास्तव्यास असणारे सभासद / ग्रामस्थ  उपस्थित होते. सभेस उपस्थितांची नावे खाली दिली आहेत.

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे (सचिव) | 2. श्री शंकर बाळकृष्ण राणे |
| 3. श्री उदय भगवान राणे (खजिनदार) | 4. श्री पांडूरंग सावजी राणे |
| 5. श्री भास्कर दौलत राणे | 6. श्री जयवंत नाना राणे |
| 7. श्री सत्यवान गणपत राणे | 8. श्री रत्नाकर नाना राणे |
| 9. श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे | 10. श्री दत्ताराम मारुती राणे |
| 11. श्री मंगेश यशवंत सावंत | 12. श्री लक्ष्मण शिवाजी राणे |
| 13. श्री बाबाजी (आबा) दिनकर राणे | 14. श्री मनोहर भिकाजी राणे |
| 15. श्री स्वप्नील पांडूरंग राणे | 16. श्री अरुण वासुदेव राणे |
| 17. श्री गौरव दशरथ राणे | 18. श्री रुपेश विजय राणे |
| 19. श्री संदेश अशोक राणे | 20. श्री शुभम दिलिप राणे |
| 21. श्री सिध्देश विजय राणे | 22. श्री साईल भिकाजी राणे |
| 23. श्री संकेत रत्नाकर राणे | 24. श्री प्रितेश रत्नाकर राणे |
| 25. श्री दिपेश विजय राणे | 26. श्री दिलिप मधुकर राणे |
| 27. श्री साबाजी विठोबा साटम | 28. श्री आनंद नारायण साटम |
| 29. श्री दशरथ दत्ताराम साटम | 30. श्री अरुण राघोजी राणे |
| 31. श्री यशवंत बाळकृष्ण राणे | 32. श्री संजय भगवान राणे |
| 33. श्री तेजश रत्नाकर राणे | 34. श्री संतोष मधुसुदन राणे |
| 35. श्री मिलिंद सदानंद राणे | 36. श्री तुकाराम विनायक राणे |
| 37. श्रीमती अनुजा अरुण राणे | |

श्री सुनिल सदानंद राणे (सचिव) यांनी उपस्थितांचे स्वागत करून सर्वांस श्री गणेश उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर त्यांनी कार्यकारीणीतील जेष्ठ सदस्य श्री पांडूरंग सावजी राणे यांस आजच्या सभेचे अध्यक्ष करावे असा प्रस्ताव मांडला तो सर्व उपस्थितांनी मंजूर केला. त्याचबरोबर श्री मनोहर भिकाजी राणे (स्थानिक जेष्ठ नागरीक), श्री भास्कर दौलत राणे, श्री रत्नाकर नाना राणे आणि श्री दशरथ दत्ताराम साटम (कार्याध्यक्ष) यांस व्यासपिठावर स्थान देण्यात आले.

श्री पांडूरंग सावजी राणे (सभाध्यक्ष) यांनी अध्यक्षस्थान स्विकारल्यावर सचिवांनी त्यांचेकडून आजची सर्वसाधारण सभा सुरवात करण्याची परवानगी घेऊन सभेस सुरवात केली. सचिवांनी आजच्या सर्वसाधारण सभेत चर्चेस येणारे कामकाजाचे विषय उपस्थितांस वाचून दाखवून त्याप्रमाणे कामकाज सुरू केले.

विषय क्रमांक १ अंर्तगत आतापर्यंत
(अ) कणकवली आचरा रोड ते फळसेवाडीकडे येणारा मुख्य रस्ता,
(ब) फळसेवाडी मुख्य रस्ता ते टेंबापर्यंत जाणारा रस्ता या दोन्ही रस्त्यांचे खडीकरण आणि डांबरीकरण होण्यासंबधी संस्था करीत असलेल्या प्रयत्नांची माहीती उपस्थितांस दिली.

फळसेवाडी मुख्य रस्ता ते टेंबापर्यंत जाणाऱ्या रस्त्यासंबधी माहीती देताना सचिवांनी सांगितले की सन २०१३ पासून संस्था करीत असलेल्या प्रयत्नांस यश आले असून स्थानिक अडचणींमुळे ग्रामपंचायतीत नोंद न होऊ शकलेला रस्ता (विठोबा साबाजी साटम यांचे घर ते पांडूरंग सावजी राणे यांचे घर – लांबी अंदाजे ८२ मीटर) आता ग्रामपंचायतीकडून नमुना क्रमांक २३ ला लावण्यात आला आहे व पुढील कार्यवाही लवकरच अपेक्षित आहे.

सचिवांनी पुढे सांगितले की वाडीच्या अडचणींसर्दंभात संस्थेतर्फे श्री नितेश नारायणराव राणे (आमदार) यांची जुलै महिण्यात भेट घेण्यात येऊन त्यांस निवेदन देण्यात आले. तसेच आमदारांनी केलेल्या सुचनेनुसार त्यांचे कणकवली येथील कार्यालयात त्यांस दिलेल्या निवेदनाची प्रत देण्यात येऊन त्याची पोच घेण्यात आली आहे.

या विषयी श्री रत्नाकर नाना राणे यांनी माहीती दिली की ग्रामपंचायतीस मिळणारा फंड हा अपूरा असल्यामुळे सर्वच कामे त्यांस करता येत नाहीत, तसेच कणकवली आचरा रोड ते फळसेवाडीकडे येणारा मुख्य रस्ता हे काम दुरुस्तीच्या सदरात मोडते व फळसेवाडी मुख्य रस्ता ते टेंबावर जाणारा रस्ता हे काम नवीन रस्ते बांधणी या सदरात मोडत असल्यामुळे या दोन्ही कामांस वेगवेगळ्या प्रकारचा फंड ग्रामपंचायतीकडे उपलब्ध होणे आवश्यक आहे. श्री रत्नाकर नाना राणे यांनी पुढे सांगितले की मुंबईस्थित ग्रामस्थांकडून श्री नितेश नारायणराव राणे यांचेबरोबर इतर आमदार किंवा कंपन्या यांचेकडून ग्रामपंचायतीस फंड उपलब्ध करण्याचा प्रयत्न व्हावा जेणेकरून कामास लवकरात लवकर सुरवात करता येईल. ग्रामपंचायतीकडे फंड येण्यासाठी यापुढील ग्रामसभेत ते या कामासाठी फंडाची आवश्यकता असल्याचा ठराव मांडून तो संमत करुन घेण्याचा प्रयत्न करतील आणि ठराव संमत झाल्यावर त्याची प्रत संस्थेस उपलब्ध करतील. संस्थेने आपल्या निवेदनाबरोबर ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत त्यांचे संर्पकातील आमदार / खासदार / कंपन्यांना पाठवावी जेणेकरून आपल्या कामासाठी निधी ग्रामपंचायतीकडे उपलब्ध होईल. श्री रत्नाकर नाना राणे यांनी हा ठराव ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत संमत करून घेण्याची जबाबदारी स्वत:वर घेतली.

यावर काही ग्रामस्थांकडून जर इतर पक्षांकडून आर्थिक सहाय्य मिळत असल्यास ते घ्यावयाचे का ? किंवा इतर पक्षांच्या आमदारांकडून (बाहेरगावातील) आर्थिक सहाय्य घ्यावयाचे का ? अशी विचारणा झाली. त्यावर संस्थेतर्फे

असे सांगण्यात आले की आपली ही कामे गेली २ ते ३ दशके काही ना काही कारणांमुळे प्रलंबित असल्यामुळे कोणाही कडून निधीची उपलब्धता झाल्यास ते फायद्याचे असेल त्यामुळे याबाबतची चिंता करण्याची आवश्यकता नाही. परंतू अश्याप्रकारे निधी उपलब्ध करतेवेळी सभासदांकडून किंवा ग्रामस्थातर्फे कोणही व्यक्ती / पक्ष किंवा कंपन्यास कोणत्याही प्रकारचे आश्वासन देण्यात येऊ नये आणि अश्याप्रकारे दिल्या गेलेल्या आश्वासनास संस्था बांधील असणार नाही. याबाबत संस्था योग्य ती काळजी घेईलच परंतू सभासदांनी आणि ग्रामस्थांनी याबाबत काळजी घेऊन सावधपणे वाटचाल करावी.

यानंतर फळसेवाडी मुख्य रस्ता आणि टेंबावर जाणारा नवीन रस्त्याच्या खडीकरण आणि डांबरीकरण करण्याच्या कामासाठी श्री नितेश नारायणराव राणे यांचेबरोबर इतर कोणत्याही पक्षाच्या खासदार किंवा आमदार तसेच कंपन्या किंवा आस्थापणे यांचेकडून निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी मंजूरी मिळविण्यासाठी ठराव मांडण्यात येऊन तो सर्वांनुमते मंजूर करण्यात आला.

सचिवांनी विषय क्रमांक १(क) अंर्तगत फळसेवाडीतील सर्व ग्रामस्थांचे घरी स्वयंपूर्ण नळयोजनेव्दारे पाणीपुरवठा करण्याबाबत करत असलेल्या प्रयत्नांबाबत माहीती दिली. या माहीती अंर्तगत संस्थेने मे. टेरा हायड्रोटेक सोल्युशन या संस्थेस नेमून रु.३५,०००/- (रुपये पस्तीस हजार फक्त) खर्च करून सर्व परीसराचे निरीक्षण केलेले असून, या संस्थेने दिलेल्या अहवालानुसार आपल्या परिसरात सार्वजनिक बोअरवेलसाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध नाही परंतू विहीर (मोठ्या घेराची) बांधल्यास दोन ठिकाणी पुरेसा पाणीसाठा मिळण्याची शक्यता आहे. त्यासाठी डोहाच्या चिंचेजवळील एक जागा योग्य असल्याचे अहवालात नमुद करण्यात आले आहे.

या विषयावर झालेल्या चर्चेदरम्याण श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी विचारले की त्यांस असे कळले की वाडीच्या ब्राम्हणभोजनास उपस्थित असलेल्या ग्रामस्थांची सभा झाली असता ब्राह्मण विहीरीत पाण्याचा पंप टाकण्याची परवानगी देऊ नये असा ठराव या सभेत मंजूर करण्यात आला आहे. जरी मंजूर करण्यात आलेल्या अश्या ठरावाची प्रत संस्थेस अजुनही मिळालेली नसली तरीही ग्रामस्थांकडून होत असलेल्या विरोधाची दखल कार्याकारीणीच्या सभेत घेण्यात येऊन ग्रामस्थांचे विचारांस प्राधान्यक्रम देण्याचे ठरविण्यात आले आहे. ब्राह्मण विहीरीत पंप बसविण्यासंबधी ग्रामस्थांचा विरोध कायम असल्यास त्याऐवजी डोहाच्या चिंचेजवळील जागेत २५ फूट ते ३० फूट घेराची नवीन विहीर बांधून घेऊन वाडीवर नळयोजनेव्दारे पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव कार्यकारीणीच्या सभेत मंजूर करून घेण्यात आला आहे.

या सर्दंभात झालेल्या चर्चेत श्री भास्कर दौलत राणे आणि श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे यांनी भाग घेतला. श्री प्रकाश हरीश्चंद्र राणे यांनी सांगितले की ग्रामस्थांचा विरोध हा ब्राम्हणविहीरीत पंप बसविण्यासाठी नसून त्यावेळी म्हणजेच २८ मे २०१७ रोजी विहीर उपसण्याचा कार्यक्रम आखण्यात आला होता त्यास होता. तसेच सध्याच्या परिस्थितीत ब्राम्हणविहीरीत पंप न लावता त्या विहीरीचे रुंदीकरण करुन पंप लावावा अशी ग्रामस्थांची इच्छा आहे.

याबाबत श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी स्पष्टीकरण केले की संस्था ब्राम्हणविहीरीत असलेला पाणीसाठा नष्ट करण्याचा विचार करेल का ? हे प्रथमत: स्थानिकांनी लक्षात घ्यावे. हा पाणीसाठा प्रथमत: वापरून नळ योजना राबविल्यास कदाचीत वाडीतील ग्रामस्थ पुढे येऊन देणगीव्दारे काही निधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे, या विचारने संस्थेने प्रथमत: ब्राम्हणविहीरीत पंप टाकून नळयोजना सुरू करण्याचा विचार केला होता.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे सांगितले की संस्थेचा इतिहास पाहता आजपावतो आपल्या वाडीस कोणत्याही पक्षामार्फत तसेच खासदार / आमदार कडून किंवा त्यांचे फंडातून सार्वजनिक कामांसाठी निधी उपलब्ध झालेला नाही. त्यापुढे महत्वाचे म्हणजे संस्थेने आतापर्यंत स्नेहसंम्मेलन, शाळेचा वर्धापन दिन अश्या प्रकारचे कार्यक्रम ग्रामस्थांकडून मिळविलेल्या वर्गणीतून / देणगीतून यशस्वीपणे पार पाडले आहेत. या गोष्टींचा विचार करता विहीरीसाठी रु.४ लाख ते रु.५ लाख एवढासा निधी खासदार किंवा आमदार फंडातून मिळविण्यासाठी किती काळ वाट पाहावयाची असा विचार श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे मांडला. श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे सांगितले की ब्राम्हणविहीरीतून आहे त्या स्थितीत पाणीपुरवठा सुरू केल्यास आपणांस तरूण पिढीमार्फत देणगीव्दारे निधी उपलब्ध होण्याची मोठी शक्यता आहे.

याबाबत साधक बाधक चर्चा झाल्यावर श्री रत्नाकर नाना राणे यांनी विचार मांडला आपण ब्राह्मण विहिर आणि डोहाची चिंच येथील नवीन प्रयोजित विहिर बांधण्यासाठी जागामालकांकडून बक्षीसपत्रे मिळवून निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यास हरकत नाही.

बक्षीसपत्रासंबधी जागामालकांची विचारणा करण्यात आल्यावर जागा मालकीबाबत स्पष्टता नसल्यामुळे शक्यतो आजूबाजूच्या सर्व जागामालकांकडून ग्रामपंचायतीच्या नावे बक्षीसपत्र मिळवावे असा विचार श्री रत्नाकर नाना राणे यांनी मांडला. याबाबत प्रत्येकी रु.३०००/- (रुपये तीन हजार फक्त) पर्यंत खर्च येईल असा अंदाज श्री रत्नाकर नाना राणे यांनी वर्तविल्यावर संस्थेच्या वतीने सचिवांनी बक्षीसपत्रासाठी होणाऱ्या खर्चास संस्था बांधील राहील असे आश्वासन दिले.

यानंतर श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पाणीपुरवठा योजने अंर्तगत लवकरच टेंबावर पाण्याची टाकी बांधण्याचे काम सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे उपस्थितांस सांगितले.

यानंतर (१) पाण्याच्या टाकीचे बांधकाम पुढील २ ते ३ महिण्यात सुरू करण्यास तसेच (२) जमीनमालकांची स्पष्टता मिळवून ब्राम्हणविहिर मोठी करणे किंवा डोहाच्या चिंचेजवळील योग्य जागेत नवीन विहीर बांधण्यासाठी बक्षिसपत्रे मिळविण्याची कार्यवाहीस सुरवात करणे आणि (३) पुढील ३ महिण्यात श्री नितेश नारायणराव राणे यांचेकडून विहीरीसाठी फंड मिळविण्याचा प्रयत्न करणे व त्यानंतर इतर कोणत्याही पक्षाच्या खासदार किंवा आमदार फंडातून किंवा कंपन्यांतून फंड मिळविण्यासाठी प्रयत्न करणे व त्यापुढे (४) ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन स्वत: किंवा इतरांकडून किंवा मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजून आवश्यक त्या फंडाची उभारणी करण्यासंबधीचे ठराव सार्वमताने मंजूर करण्यात आले.

तसेच पाण्याची टाकी बांधून झाल्यावर तात्पुरते ब्राम्हणाच्या विहीरीतून टाकीमध्ये पाणी चढवून वाडीवर पाणीपुरवठा करण्याचा प्रकल्प सुरू करणे व त्यानंतर ब्राम्हणविहीर मोठी करण्याची योजना राबविणे यास तात्विक परवानगी देण्याच्या ठरावासही मान्यता देण्यात आली.

सचिवांनी कार्यक्रम पत्रिकेत नमुद विषय क्रमांक २ अर्तंगत या श्री गणेश उत्सवादरम्याण पथदिव्यांची व्यवस्था करण्यात येत असून या योजनेअंर्तगत वाडीवर ८ एल ई डी (२ लाईट ६० वॅटचे व ६ लाईट ४० वॅटचे) लावण्यात येणार आहेत. या लाईटपैकी ४ लाईट सध्या असलेल्या खांबावरती लावण्यात येणार असून उर्वरीत ४ लाईट नवीन खांबावरती लावण्यात येणार आहेत. सचिवांनी पुढे सांगितले नवीन ४ खांबांची व्यवस्था करण्यात आली असून

कामगार आणि वायरमन मिळाल्यावर हे काम पूर्ण केले जाईल. कामगार न मिळाल्याकारणे खांब पुरण्याचे काम होऊ शकत नसल्यामुळे सध्यातरी तात्पुरती उपाययोजना म्हणून उपलब्ध असलेल्या झाडांवर नवीन खांब बांधून व जवळील घरातून लाईट कनेक्शन घेऊन हे लाईट चालू करण्यात आलेले आहेत.

यावर श्री स्वप्निल पांडूरंग राणे यांनी खांब पुरण्याचे काम स्वत:च्या शिरावर घेऊन युवकांना दुसऱ्या दिवशी १०:०० वाजता एकत्रित येऊन संस्थेने आयोजिलेले काम पूर्ण करून देण्याचे आवाहन केले. श्री स्वप्निल पांडूरंग राणे यांनी केलेल्या आवाहनास सर्व युवकांनी उस्पूर्तपणे प्रतिसाद देऊन दुसऱ्या दिवशी काम करून देण्याची खात्री दिली. कार्यकारीणी सदस्या श्री संकेत रत्नाकर राणे यांचे मार्गदर्शनाखाली हे काम पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले.

विषय क्रमांक ३ अर्तंगत सचिवांनी स्थानिक कार्यकर्त्यांस नवीन सभासद नोंदणीमध्ये काही अडचणी येत आहेत का अशी विचारणा केली असता श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे यांनी सांगितले की पिसेकामते तसेच फळसेवाडी संस्थेचे फार्म १८ वर्षांखालील व्यक्तीनाही पाठविण्यात आलेले आहेत कारण त्यांच्या लहान नातीच्या नावे हे फार्म मिळालेले आहेत. ही बाब विचारात घेता या दोन्ही संस्था १८ वर्षाखालील व्यक्तीनिही सभासदत्व स्विकारावे अशी अपेक्षा करीत आहे का ? अशी विचारणा केली.

यावर श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी खुलासा केला की १८ वर्षाखालील व्यक्तींनी संस्थाचे सभासदत्व स्विकारावे अशी अपेक्षाच नाही. आपल्या बाबतीत कदाचीत व्यक्तीची जन्मतारीख चुकीची पडली असल्यामुळे त्या व्यक्तीचे वय चुकून १८ वर्षापेक्षा जास्त होऊन फार्म पाठविण्याची चूक झाली असावी. श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे सांगितले की आपल्याशी याबाबत संर्पक करण्यात येईल व जन्मतारखेबाबत चुक झाली असल्यास त्यात दुरुस्ती करण्यात येईल तोपर्यंत आपल्या कुटूंबातील १८ वर्षावरील सर्व व्यक्तींनी पिसेकामते आणि फळसेवाडी संस्थांचे सभासद होऊन सभासद नोंदणीच्या कार्यक्रमास सकारात्मक प्रतिसाद द्यावा.

त्यापुढे श्री रत्नाकर नाना राणे यांनी प्रत्येक नविन होऊ इच्छिणाऱ्या सभासदाने रु.६००/- (रुपये सहाशे फक्त) हे वार्षिक वर्गणी देणे अपेक्षित आहे का ? अशी विचारणा केली. यावर श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी खुलासा केला की फळसेवाडी संस्थेच्या सभासद नोंदणी फार्ममध्ये वयस्कर ग्रामस्थांना, ग्रहिणींना तसेच नोकरीधंदा करत नसलेल्या व्यक्तींस वार्षिक वर्गणी न भरण्याची सवलत दिलेली आहे. ज्यांना रु.६००/- हि वार्षिक वर्गणी जाचक वाटत असेल त्यांनी या सवलतीचा लाभ घ्यावा. तसेच याबाबत आवश्यक असलेला ठराव पुढील सर्वसाधारण सभेत मंजूर करून घेण्यात येईल.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे सर्व १८ वर्षावरील ग्रामस्थांनी संस्थेचे सभासद व्हावे व संस्थेचे संघटण मजबूत करावयाचा प्रयत्न करावा जेणेकरून कार्यकारीणीस संख्याबळाच्या आधारवर उपलब्ध सार्वजनिक निधी खेचून आणण्यास बळ मिळेल असे आवाहन केले.

यानंतर श्री रत्नाकर नाना राणे यांनी सर्व १८ वर्षावरील स्थानिक ग्रामस्थांकडून पिसेकामते विकास मंडळ आणि फळसेवाडी हितकारी संस्थांचे सभासद करून घेण्याची जबाबदारी स्वत:चे शिरावर घेतली.

श्री संकेत रत्नाकर राणे यांनी या श्री गणपती उत्सवादरम्याण स्थानिक सर्व ग्रामस्थांकडून सभासद नोंदणीचे काम पूर्ण करण्यात येईल अशी खात्री दिली व या बाबीस उपस्थितांनी संपूर्ण पाठींबा दिला.

विषय क्रमांक ४ अंर्तगत काही सूचना / विचार व्यक्त करावयाचे आहेत का ? अशी विचारणा सचिवांकडून करण्यात आली.

श्री रत्नाकर नाना राणे यांनी विचारणा केली की आता अस्तित्वात असलेली कार्यकारीणी कायम राहणार आहे का ? तसेच याच कार्यकारीणी मार्फत सर्व कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत का ? याबाबत श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी खुलासा केला की संस्थेस नवीन कार्यकारीणी स्थापन करावयाची आहेच, परंतू त्यापूर्वी सभासद नोंदणी पूर्ण व्हावयास हवी जेणेकरून तरूण रक्ताचा तसेच नवीन विचारांच्या कार्यकत्यांचा संस्थेत सामावेश होईल व त्यानंतर पुढील सर्वसाधारण सभेत कार्यकारीणीमध्ये खांदेपालट करता येईल. हा बदल लोकशाही मार्गाने व आवश्यकता भासल्यास निवडणूकीव्दारे देखील करता येईल. श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे सांगितले की प्रथमत: संपूर्ण कार्यकारीणी न बदलता काही कार्यकारीणी सदस्य बदलावयाचा विचार आहे जेणेकरून सध्याच्या कार्यकारीणी सदस्यांच्या अनुभवाचा आणि माहितीचा लाभ नवीन कार्यकारीणी सदस्यांस होऊ शकेल. या खुलाश्यांने सर्व उपस्थितांचे समाधान झाले.

श्री दिलिप मधुकर राणे यांनी विचारणा केली की एवढ्या २० ते २२ वर्षाचा जमाखर्च मांडण्याची काय आवश्यकता होती. यावर श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी खुलासा केला की त्यांचे कानावर कार्यकारीणी खर्चाचा हिशेब देत नाही अशी कुजबूज नेहमीच ऐकू येत होती. तसेच श्रीमती तृप्ती अविनाश राणे यांचेकडून यापूर्वीच्या सर्वसाधारण सभेत याबाबत विचारणा देखील करण्यात आली होती. त्यामुळे हा संपूर्ण जमाखर्च मांडण्याचा खटाटोप करण्यात आला. या २० ते २२ वर्षाच्या कालावधीत संस्थेतर्फे करण्यात आलेल्या कार्यक्रमांअर्तंगत जमा झालेली काही रक्कम बँक ऑफ इंडियाच्या खात्यात जमा करण्यात आले होती तसेच काही खर्चही या खात्यातून करण्यात आला होता. तसेच सभासदांकडून जमा होणाऱ्या वार्षिक वर्गणीची काही रक्कम या खात्यामध्ये जमा करण्यात आल्यामुळे या संपूर्ण वर्षांचा जमाखर्च मांडणे आवश्यक ठरले होते. आता हे काम पूर्ण झाले असून लवकरात लवकर या जमाखर्च संस्थेच्या संकेतस्थळावर (web-site) उपलब्ध करण्यात येईल.

श्री रत्नाकर नाना राणे यांचेकडून विचारणा करण्यात आली की संस्थेची स्वत:ची ई-मेल आय डी आहे का ? यावर श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी माहीती दिली की संस्थेचे स्वत:चे संकेतस्थळ (web-site) आहे, परंतू कामाच्या व्यापामुळे तसेच प्राधान्यक्रमामुळे या संकेतस्थळावर गेली दोन वर्षे काहीही काम केले गेलेले नाही. मी लवकरात लवकर हे काम मार्गी लावण्याचा प्रयत्न करेन. या संकेतस्थळावर फळसेवाडीसंबधी माहीती, कार्यकारीणी सदस्यांची नावे व संर्पक क्रमांक (त्यांचे फोटोसहीत), संस्थेच्या मागील वर्षातील सभांचे इतिवृत्त तसेच कार्यकारीणीच्या सभांचे इतिवृत्त, संस्थेची मागील वर्षाची हिशेबपत्रके आणि इतर आवश्यक माहीती उपलब्ध करण्यात येईल. या संकेत स्थळास ई-मेल आय डी असेल व त्यामार्फत किंवा फेसबुक मार्फत सभासदांना संस्थेच्या कार्यक्रमांची माहीती देता येईल.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी उपस्थितांस सांगितले की हरितालीका पुजेच्या दरम्याण रात्री झालेल्या भजनाचे वेळी संस्थेचे सचिव श्री सुनिल सदानंद राणे यांनी यावर्षी एस. एस. सी. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या स्थानिक तीन विद्यार्थीचा सत्कार करण्याबाबत माहीती दिली असता संस्थेचे सभासद श्री सत्यविजय शिवराम राणे यांनी याच वर्षी या सत्काराचे प्रयोजन काय तसेच यापूर्वीही संस्थेच्या सभासदांची व ग्रामस्थांच्या मुलांनी वेगवेगळ्या क्षेत्रात व क्षैषणीक पातळ्यांवर यश मिळविल्यानंतर त्यांचा सत्कार का केला गेला नाही अशी विचारणा केली. श्री सत्यविजय

शिवराम राणे यांनी उपस्थित केलेल्या या मुद्याला श्री भास्कर दौलत राणे यांनी पांठिंबा दर्शविला. भजनाचे ठिकाण हे चर्चा करण्याचे व्यासपीठ नसल्याकारणे त्यादिवशी या विषयावर चर्चा करणे योग्य नाही असे वाटल्यामुळे मी या मुद्यावर माझे मत त्यादिवशी व्यक्त केले नाही असे श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी सांगून आज या ठिकाणी मी या मुलांच्या सत्काराचा मुद्दा मांडत असून या एस. एस. सी. परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या मुलांचे कौतूक करणे तसेच त्यांस प्रोत्साहन देणे आवश्यक आहे असे मत मांडले.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी त्यापुढे सांगितले की यापूर्वी कधी कोणाचा सत्कार केला नव्हता ही माहीती चुकीची असुन यापूर्वी स्नेहसंम्मेलानाचे वेळी विशेष शैक्षणीक प्राविण्य मिळविलेल्या तसेच एस. एस. सी. आणि एच. एस. सी. तसेच पदवीधर विद्यार्थी असे जवळपास १०० जणांचा सत्कार केला गेला होता. परंतू त्यानंतर संस्था काही काळ कार्यरत नसल्यामुळे गुणवंतांच्या सत्काराची ही प्रथा बंद पडली होती.

श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी पुढे सांगितले की श्री सत्यविजय शिवराम राणे स्वत: हा मुद्दा मांडताना सत्कार करण्याची ही प्रथा चांगली असल्याचे मतही मांडले होते. यानंतर या प्रथेस कोणाचा आक्षेप आहे का अशी उपस्थितांस विचारणा करण्यात आली. परंतू या प्रथेस कोणीही आक्षेप न नोंदविल्याकारणे तीनही गुणवंतांचा म्हणजेच कु प्रितेश रत्नाकर राणे (७६%), कु साहिल भिकाजी राणे (७५.६०%) आणि कुमारी रेणूका रामदास राणे (७८%) यांचा सत्कार अनुक्रमे श्री भास्कर दौलत राणे, श्री मनोहर भिकाजी राणे आणि श्री पांडूरंग सावजी राणे यांचे हस्ते करण्यात आला.

श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे यांनी ही प्रथा कायम चालू ठेवावी अशी अपेक्षा व्यक्त केली असता सभासदांनी तसेच ग्रामस्थांनी एकमेकांच्या संर्पकात राहून संस्थेस गुणवंत विद्यार्थ्याबाबत वेळोवेळी माहीती दिल्यास संस्थेस त्यांचे सत्काराचा कार्यक्रम आखता येईल असे सचिवांतर्फे सांगण्यात आले.

यानंतर सचिवांनी आजची सभा खेळामेळीच्या वातावरणात पार पडल्याबद्दल समाधान व्यक्त केले. सर्व सभासदांनी आणि ग्रामस्थांनी कार्यकारीणीस असेच सहकार्य करावे आणि संस्थेची ध्येये लवकर पार पाडण्यासाठी हातभार लावावा अशी इच्छा व्यक्त केली.

नंतर सचिवांनी कार्यकारीणी सदस्या श्रीमती अनुजा अरुण राणे यांचे त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. तसेच श्री संकेत रत्नाकर राणे आणि श्रीमती अनुजा अरुण राणे यांनी श्री गणपती उत्सवापूर्वी टेंबावर येणारा वाहनरस्ता साफ करून घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानले. स्थानिक कार्यकारीणी सदस्यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करून सभेची राष्ट्रगीताने समाप्ती करण्यात आली.

श्री सुनिल सदानंद राणे
सचिव
दिनांक ३० ऑगष्ट २०१७

श्री पांडूरंग सावजी राणे
सभाध्यक्ष व कार्यकारीणी सदस्य